अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.२४ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १४७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

कंटेनरखाली दुचाकी घुसली; एक ठार तर एक गंभीर जखमी

सोलापूर : अक्कलकोटवरून सोलापूरकडे विरुद्ध दिशेने येणारा कंटेनरच्या खाली सोलापूर हुन कुंभारी कडे जाणाऱ्या दुचाकी थेट कंटेनर खाली घुसून एकाचा जाग्यावरच मृत्यू झाला. तर दुसरा इसम गंभीररीत्या जखमी झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

ही घटना गुरुवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगर जवळील टाटा शोरूम समोर घडली. याबाबत मिळालेली माहिती अशी की,पवन

आणि विनीत असे दोघाचे नावे असल्याचे सांगण्यात आले. दोघेजण एकाच दुचाकीवरून सोलापूरहून कुंभारी कडे निघाले होते. त्यावेळी अक्कलकोटहून सोलापूरकडे विरुद्ध दिशेने येणाऱ्या कंटेनरचा अंदाज न आल्याने दुचाकी थेट कंटेनर खाली जाऊन त्या कंटेनरचे चाक अंगावरून गेल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला आहे.तर एक जण गंभीर रित्या जखमी झाला आहे.घटनेच्या ठिकाणी पोलिसांनी पंचनामा करत अपघातात गंभीर जखमी झालेल्या इसमास उपचारासाठी सिव्हिल रुग्णालयात पाठवले तर मयत इसमाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. या घटनेची प्राथमिक नोंद वळसंग पोलीस ठाण्यात झाली असून,रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

न्यायालयाने हा प्रकार वैध ठरवला तर

१९५० पासून हृदयाजवळ ठेवलेल्या गोष्टीचा मृत्यू होईल

कपिल सिब्बल | संस्थात्मक सार्वभौमत्व आणि राज्यघटनेची जपणूक करण्यासाठी मी इथे उभा

सुराज्य/नवी दिल्ली

'मी हरेन किंवा जिंकेन. मात्र, मी इथे फक्त या प्रकरणासाठी उभा नाही. मी इथे आपल्या सगळ्यांच्या हृदयाच्या जवळ असणाऱ्या एका गोष्टीसाठी उभा आहे. संस्थात्मक सार्वभौमत्व आणि राज्यघटनेची जपणूक करण्यासाठी मी इथे उभा आहे. न्यायालयाने हा सगळा प्रकार वैध ठरवला, तर आपण १९५० सालापासून जी गोष्ट इतकी काळजीपूर्वक जपून ठेवली आहे, तिचा मृत्यू होईल', अशा सूचक शब्दात घटनात्मक पेचप्रसंगावर अचूक बोट ठेवत ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात सलग तिसऱ्या दिवशी सुरू असलेला युक्तिवाद संपवला. मात्र हा युक्तिवाद संपवता संपवता सिब्बल स्वत: भावनावश झाले. त्यांचे डोळे पाणावले आणि कोर्टात स्मशानशांतता पसरली.

गेल्या तीन दिवसांपासून महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल युक्तिवाद करत होते. तिसऱ्या दिवशी म्हणजे गुरूवारी दुपारी आपला युक्तिवाद संपवताना भारतीय राज्यघटना, या घटनेने निर्माण केलेले संस्थात्मक सार्वभौमत्व आणि त्यांच्याकडून राज्यघटनेचीच केली जाणारी पायमल्ली यावर अचूक बोट ठेवत न्यायालयासमोरील घटनात्मक पेच सोडवायचा असेल तर सर्वोच्च न्यायालयाची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर भाष्य केले. गुरूवारी केलेल्या सलग अडीच तासांच्या युक्तिवादात सिब्बल यांनी राज्यपालांची संशयास्पद भूमिका न्यायालयासमोर मांडली. चालू असलेले सरकार राज्यपाल कोश्यारी यांनी मुद्दाम पाडले. शिवसेनेचेच सरकार असताना शिवसेनेचेच आमदार सत्ता कशी काय पाडू शकतात? पक्षाचेच आमदार अविश्वास प्रस्ताव कसे आणू शकतात? राज्यपालांनी अधिकाराचा गैरवापर केला. सत्तासंघर्ष सुरू असताना उद्धव ठाकरेंनी भाजपला पाठिंबा दिला नव्हता. शिंदे गटाने भाजपला पाठिंबा दिला, त्यामुळे नियमांचे उल्लंघन झाले. राज्यपाल स्वत:हून बहुमत चाचणी घेऊ शकत नाहीत, असा युक्तिवाद करत सिब्बल यांनी तत्कालीन राज्यपाल कोश्यारी हे सत्तांतराच्या कटात सहभागी असल्याचे न्यायालयास निक्षून सांगितले.

विधानसभा अध्यक्षांकडे जाणार नाही

आमदार भरत गोगावलेंची प्रतोद म्हणून नेमणूक आसाममध्ये होऊ शकत नाही. गोगावले प्रतोद झाल्यानंतर ठाकरे गटाच्या आमदारांना व्हीप बजावण्यात येत आहे. त्यांची नेमणूकच चुकीची आहे. तसेच बंडखोर आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय न्यायालयानेच घ्यावा. विधानसभा अध्यक्षांकडे जाण्यात काहीच अर्थ नाही. आम्ही विधानसभा अध्यक्षांकडे जाणार नसल्याचेही सिब्बल यांनी युक्तिवादात म्हटले.

- मुळात राहुल नार्वेकरांची विधानसभा अध्यक्षपदी निवडच चुकीच्या पद्धतीने झाली आहे. या निवडीत शिंदे गटाने पक्षाच्या 'व्हीप'चे उल्लंघन केले.
- नार्वेकरांची निवड होण्यापूर्वी ३९ आमदारांना अपात्रतेची नोटीस देण्यात आली होती. त्यांच्यावर कोणतीच कारवाई न होता त्यांना अध्यक्षपद निवडणुकीत मतदान कसे करता आले?
- एकनाथ शिंदे यांच्यावरही अपात्रतेची कारवाई प्रलंबित होती, राज्यपालांनी शिंदेंना सत्ता स्थापन करण्यासाठी निमंत्रण कसे काय दिले? राज्यपालांची ही कृती घटनाविरोधी नव्हती का?
- हेतूबाबत शंका येईल असे निर्णय राज्यपालांनी त्या काळात घेतले म्हणून उद्धव ठाकरेंनी बहुमत चाचणीपूर्वी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला.

न्यायालयाच्या निर्णयाचा गैरवापर

आमदारांच्या अपात्रतेबाबत न्यायालयाच्या निर्णयाआधीच निवडणूक आयोगाने केवळ आमदारांचे बहुमत गृहीत धरून निकाल दिला आहे. ज्यांच्यावर अपात्रतेची टांगती तलवार आहे, त्यांना गृहीत धरून आयोग निर्णय कसा काय दिला? न्यायालयाच्या निर्णयाचा शिंदेंनी गैरवापर केला. आमच्यावर अन्याय झाला आहे. शिवसेनेत दोन गट आहेत, याची कल्पना आयोग नव्हती का? असा सवाल सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी केला. त्यावर एका पक्षात दोन गट झाले असतील तर त्यावर आयोग निर्णय घेऊ शकतो, असे सिब्बल यांनी सांगितले.

नारळाच्या झाडावरून पडल्याने मजूर ठार; काजळा येथील घटना

सुराज्य/सोलापूर

झाड तोडत असताना पाय घसरून नारळाच्या झाडावरून खाली कोसळल्याने ३७ वर्षीय मजूर गंभीर जखमी होऊन मरण पावला. ही घटना काजळा (जि.उस्मानाबाद) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली.

सचिन हरिशचंद्र भोसले (वय ३७ रा . काजळा)असे का मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. ते बुधवारी दुपारी काजळा येथील गावात नारळाच्या झाडावर चढून झाड तोडत होते. अचानक पाय घसरल्याने ते उंचावरून खाली कोसळून गंभीर जखमी झाले होते.

त्यांना उस्मानाबादच्या येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात (पुतण्या) शुभम भोसले यांनी बेशुद्ध अवस्थेत दाखल केले होते. ते आज गुरुवारी पहाटे मयत झाले.मयत सचिन भोसले यांच्या पश्चात पत्नी आणि तीन मुली असा परिवार आहे. अशी प्राथमिक नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

एनटीपीसीत नोकरीचे आमिष; चौघांना २५ लाखांचा गंडा

सुराज्य/सोलापूर

एनटीपीसीमध्ये मोठ्या पदावर नोकरी लावतो म्हणून चौघांकडून रक्कम घेऊन एकूण २५ लाख ५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी एकाविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.जुन २०२० ते १३ जुलै २०२१ रोजी पर्यंत घडली.

याप्रकरणी अल्तमश सिराजअहमद हिरापुरे (वय-३२, रा.संजीव नगर लक्ष्मीनारायण टॉकीजच्या पाठीमागे सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून सुरज रमेश चव्हाण (रा.चित्तुर चनम्मा नगर,विजापूर रोड सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. वृत्तपत्रांमधील जाहिरात पाहून फिर्यादी यांनी ७०२०२१२४५६ या क्रमांकावर संपर्क केला.त्यावेळी वरील संशयित आरोपी याने मी एनटीपीसी मध्ये मोठ्या पदावर नोकरीच आहे.

माझे मोठ्या लोकांमध्ये उठणे-बसणे आहे.मी बऱ्याच मुलांना सरकारी व मोठ्या कंपनीमध्ये नोकरीला लावले आहे. असे फिर्यादी यांना

सांगितले. त्यानंतर फिर्यादी यांच्या वडिलांनी वरील संशयित आरोपी सुरत चव्हाण यांच्यावर विश्वास ठेवून फिर्यादीस एनटीपीसीमध्ये इलेक्ट्रिक इंजिनियर या पदाकरिता नोकरीला लावतो म्हणून ५ लाख ९० हजार रुपये, अजहर मो.आजम शहापुरे, (रा.सिद्धेश्वर पेठ सोलापूर) यांना ज्युनिअर इलेक्ट्रिक इंजिनिअर या पदावर नोकरीच लावतो म्हणून ६ लाख १० हजार रुपये, इमरान दाऊद पिरजादे (रा.सिद्धेश्वर पेठ) यांना शिक्षण व डिप्लोमाच्या अनुषंगाने नोकरीला लावतो म्हणून ६ लाख ५५ हजार रुपये तसेच मकबुल दुधनशाह शेख (रा. सिद्धेश्वर नगर मजरेवाडी यांच्याकडून ५ लाख ९० हजार रुपये असे एकूण २५ लाख ५ हजार रुपये चौघांकडून घेऊन नोकरीस न लावता फसवणूक केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कुकडे हे करीत आहेत.

सामूहिक बलात्कार प्रकरण; बरगंडेला ५ दिवस पोलीस कोठडी

सोलापूर : सामूहिक बलात्कार प्रकरणातील शिवसेना उपशहर प्रमुख (शिंदे गट) विष्णू गुलाब ऊर्फ चंद्रकांत बरगंडे (वय४७, धंदा.नोकरी, रा.शिवाई निवास औसे वस्ती, आमराई सोलापूर) याला तपास अधिकारी तथा ग्रामीण पो. अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी नुकतीच अटक केली. त्याला ५ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायदंडाधिकारी जयश्री काकडे यांनी गुरुवारी दिला आहे.

३१ ऑक्टोबर२०२१ रोजी विष्णू बरगंडे आणि मुख्य आरोपी गणेश कैलास नरळे यांनी संगनमत करून फिर्यादी पिडितेस ठार मारण्याची तसेच बदनामी करण्याची धमकी देऊन पुणे येथे येऊन गेले होते. आणि तिच्यावर बळजबरीने सामूहिक अत्याचार केला होता. अशा आशयाची फिर्याद पिडीतेने पोलिसात दिली होती. या प्रकरणात फौजदार चावडीच्या पोलिसांनी गणेश कैलास नरळे आणि विष्णू बरगंडे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात पोलिसांनी गणेश कैलास नरळे यास अटक केली. त्यानंतर फौजदार चावडीच्या पोलिसांनी गणेश कैलास नरळे याच्या विरुद्ध भादवि कलम ४१% अंतर्गत दोषारोपपत्र पाठवून आरोपी विष्णू बरगंडे या आरोपीला गुन्ह्यातून वगळण्याचा अहवाल न्यायालयात दाखल केला होता. त्यानंतर फिर्यादीने सदर अहवालाविरुद्ध या प्रकरणाचा निष्पक्षपाती तपास करावा म्हणून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याप्रमाणे पोलीस महासंचालकांनी सदरचा गुन्हा सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्याकडे तपास करिता वर्ग केला होता. त्याप्रमाणे पो.अधीक्षक सरदेशपांडे यांनी बुधवारी आरोपी विष्णू बरगंडे याला अटक करून गुरुवारी न्यायालयासमोर हजर केले. आणि तपास कामासाठी आरोपीला ७ दिवस पोलीस कोठडीची मागणी केली होती. न्यायालयाने सरकारी आणि आरोपी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीला ५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणात मूळ फिर्यादीतर्फे डॉ. प्रशांत नवगिरे, डॉ.श्रीपाद देशक तर सरकारतर्फे डॉ. आसावरी जोशी तर आरोपी तर्फे डॉ.महिंद्रकर यांनी काम पाहिले.

घेरडी पेट्रोल पंपावर कामगारानेच केला चोरीचा बनाव

सुराज्य/सांगोला

सांगोला तालुक्यातील घेरडी ते वाणिजिंचाळे रोडवर झालेल्या पेट्रोल पंपावरील चोरी प्रकरणाचा सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपास लावला असून फिर्यादी हर्षद गजानन सोनवणे रा घेरडी या कामगारानेच चोरीचा बनाव केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

हर्षद सोनवणे याच ताब्यात घेऊन पोलिसांनी अटक केली आहे पोलिसांनी त्याच्याकडून दोन लाख सोळा हजार रुपये हस्तगत केले आहे. स्कार्पिओ जीप मधून आलेल्या अज्ञात चौघांनी पेट्रोल पाहिजे असे म्हणत पंपावरील कामगाराच्या गळ्याला चाकू लावून लॉकर मधून सुमारे दोन लाख १६ हजार रुपयाची रक्कम पळवून नेल्याची घटना मंगळवार मध्यरात्री दोन वाजण्याचे सुमारास घडली होती याबाबत कामगार हर्षद सोनवणे यांनी पोलिसात फिर्याद दिली होती दरम्यान या घटनेची माहिती व फिर्याद घेऊन सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांनी पोलीस पथकासह शाम पेट्रोल पंपावर दाखल झाले यावेळी पोलिसांच्या पथकाने हर्षद सोनवणे व कामगार चैतन्य सरगर यांच्याकडे वेगवेगळी चौकशी केली यावेळी हर्षद यांच्याकडे विचारपूस केल्यानंतर तो बुचकळ्यात पडला व त्याने प्लॅन करून चोरीचा बनाव केल्याची कबुली दिली तर कामगार चैतन्य सरगर याने हर्षदने बनाव केल्याचे सांगितले चोरीची रक्कम हर्षद सोनवणे यांनी घराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत खड्डा खोदून पुरून ठेवले होते व कोणाला संशय येऊ नये म्हणून त्याच्यावर गवत टाकले होते पोलिसांनी पंचा समक्ष सदर रोकड हस्तगत केली आहे.

ही कामगिरी सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, पीएसआय शैलेश खेडकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक खाजा मुजावर, पोलीस हेडकॉन्स्टेबल नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, अक्षय दळवे, मोहन मनसावाले, अक्षय डोंगरे, चालक समीर शेख यांनी केली आहे.

रेल्वेखाली सापडून लष्कर येथील इसम ठार

सोलापूर : धावत्या रेल्वे खाली सापडून लष्कर येथील एक इसम ठार झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. यल्लप्पा सोनअप्पा म्हेत्रे (वय ४६, रा .प्रकाश बापूजी हाउसिंग सोसायटी, लष्कर सोलापूर) असे त्या मयत इसमाचे नाव आहे.

कोणत्यातरी धावत्या रेल्वे ची धडक लागून सदर व्यक्ती दोन्ही पाय धडा वेगळे होऊन मृता अवस्थेत रेल्वे किमी नंबर ४५७ या ठिकाणी बुधवारी सायंकाळी आढळून आला. ही खबर स्टेशन मास्तरांनी दिली असता सोलापूर लोहमार्ग चे पोलीस शिपाई पी एस गायकवाड यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात दाखल केला.

निसरा डोळा

– प्रकाश पोरे

हसी' मतलब फसी' !!!

कल्याण
380-12-336

मेन बाजार
126-96-240

ठाकरे गटाला धक्का...

माजी आ. ज्ञानेश्वर पाटील पुढील ५ वर्षे निवडणूक लढवण्यास अपात्र

उस्मानाबाद : उद्धव ठाकरे गटाचे भूम-परंडा मतदारसंघाचे माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांनी २००१ नंतरचे अपत्य कमी दाखवल्याचे कारण देत पुढील ५ वर्षे निवडणूक लढवण्यासाठी अपात्र ठरवण्याचा निर्णय लातूर विभागीय सहनिबंधक यांनी दिला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंशी सुरू असलेल्या सत्तासंघर्षाच्या संकटात तसेच पक्षचिन्ह आणि पक्षनाव गमावलेल्या ठाकरेंना हा मोठा धक्का आहे.

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेत ज्ञानेश्वर पाटील हे संचालक होते. प्राथमिक कृषी पतपुरवठा व विविध कार्यकारी सोसायटी मतदारसंघातून ज्ञानेश्वर पाटील यांनी निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत



ते विजयी झाले होते. २१ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या निवडणुकीत ज्ञानेश्वर पाटील यांनी अपत्य कमी दाखवल्याचे कारण देत आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांचे पुतणे उस्मानाबादचे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांनी तक्रार केली होती.

ज्ञानेश्वर पाटील यांच्या पहिल्या पत्नीचे निधन झाले असून त्यांच्यापासून पाटील यांना पहिले अपत्य ७ मार्च १९९३ रोजी झाले होते. दुसरे अपत्य १२ ऑगस्ट १९९५ रोजी झाले होते. यानंतर पाटील यांनी दुसरा विवाह केला. दुसऱ्या पत्नीपासून पहिले अपत्य १५ सप्टेंबर २००६ रोजी तर दुसरे अपत्य १५ ऑक्टोबर २००८ रोजी झाले.

या चारही अपत्यांच्या जन्माची नोंद बार्शी नगरपरिषदेत करण्यात आली होती. दरम्यान २००१ नंतर २ अपत्य असल्याने त्यांचे संचालक पद रद्द करण्याची मागणी धनंजय सावंत यांनी केली होती. याची सुनावणी लातूर विभागीय सहनिबंधक डॉ. ज्योती मेटे यांनी करताना पुढील ५ वर्षे जिल्हा बँकेची निवडणूक लढवता येणार नाही, असा निर्णय दिला आहे. ज्ञानेश्वर पाटील हे भूम परंडा मतदारसंघातून २ वेळेस आमदार होते.

पानगाव येथे सडलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह; घातपाताचा संशय

सुराज्य/बार्शी

पानगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या पाठीमागील मोकळ्या परिसरामध्ये एका अज्ञात व्यक्तीचे प्रेत सडलेल्या अवस्थेत आढळले असून घातपाताचा संशय व्यक्त होत करण्यात येत आहे.

बार्शी तालुका पोलिसात अकस्मात मयत अशी नोंद झाली आहे. पानगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी प्रमोद मांजरे यांनी याबाबत तालुका पोलिसांना खबर दिली. पशुधन विकास अधिकारी प्रमोद मांजरे हे दि.२३ रोजी नेहमीप्रमाणे सकाळी ९ वा.चे सुमारास पानगाव येथे ड्युटीवर गेले होते. सदर ठिकाणी ते व पशुधन पर्यवेक्षक हनुमंत तिकटे दोघे काम करीत असताना त्यांना उग्र वास आल्याने दोघेजण दवाखान्याचे इमारतीच्या बाहेर येऊन इमारतीच्या पाठीमागे वासाच्या दिशेने जाऊन पाहिले असता तेथे त्यांना एका अज्ञात पुरुषाचे सडलेले प्रेत दिसले. त्यांनी पोलिसांना खबर दिल्यानंतर तालुका पोलिसांनी पंचनामा केला. अधिक तपास फौजदार जाधव करत आहेत.

मयत व्यक्तीबाबत पोलिसांचे आवाहन

एक पुरुष जातीचे अंदाजे वय ४५ वर्ष, बांधा - मजबूत,त्याचे अंगावर शर्ट फिकट भगवा, पॅन्ट नारंगी रंगाची, उजव्या हातात व पायात काळा दोरा बांधलेला मिळून आलेला आहे. याबाबत कोणाला काही माहिती असल्यास तात्काळ बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे कळवावे असे आवाहन सपोनी महारुद्र परजने यांनी केले आहे.